# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार (अपील) क्र. २६६/२००८/ दिनांक :

१) श्री. आनंदा गणपती शेटके,
मु.पो. पाडळी, ता. हातकणंगले, अर्जदार
जि. कोल्हापूर

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा
नोडल ऑफीसर, म.रा.वि.वितरण कं.लि.,
संवसु मंडळ कार्यालय, ताराबाई पार्क,
कोल्हापूर.

२) कार्यकारी अभियंता,
म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित. विरूध्द पक्षकार
विभागीय कार्यालय, जयसिंगपूर

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.
उपविभागीय कार्यालय,
वडगांव

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित तर्फे

**कोरम** :–		१) श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष,
२) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य–सचिव
३ श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार



प्रस्तुत तक्रार / अपील हे अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर यांचेकडील तक्रार अर्ज दिनांक ७.७.२००८ संदर्भात दिनांक ७.८.२००८ रोजी दिलेल्या आदेशाविरुध्द करण्यात आलेले आहे. मुळ अर्जदार श्री. आनंदा गणपती शेटके, रा. पाडळी, विद्य ुत ग्राहक क्रमांक २५०१९२१०९७३२ असे होत. सदरचा ग्राहक हा घरगुती वापरासाठी वीज वापरणारा आहे. मौंजे पाडळी, ता. हातकणंगले गट नं. ३०९ मध्ये अर्जदाराचे शेतघर असून त्यांनी घरासाठी वीज पुरवठा घेतला आहे. सुरुवातीस त्यांचा मीटर क्र. ९००००००८७५७ असा असून सन १९९९ पसून ते ग्राहक आहेत. त्यांनी वेळोवेळी आपली वीज बिले भरलेली आहेत. मात्र जानेवारी २००७ मध्ये त्यांना एकूण युनिट २३१५ चे रु. १०१६०/– एवढे बील आले. सदरची रक्कम अवाजवी व चुकीची असलेने अर्जदाराने लागलीच दि. १५.२.२००७ रोजी संबंधित शाखा अधिकारी यांचेकडे तक्रार अर्ज दिला. अधिकाऱ्यांनी योग्य दाद न घेतलेने व रक्कम फार मोठी व चुकीची असलेने सदर ग्राहक वीज बील भरु शकला नाही. शेवटी डिसेंबर २००७ मध्ये अर्जदाराचा विद्युत पुरवठा तात्पुरता खंडित केला आहे. तद्नतरही जुलैं २००८ पर्यंत विद्युत पुरवठा बंद असतांनाही बेकायदेशीरपणे विद्युत देयके देण्यात आलेली आहेत.

दरम्यान अर्जदाराच्या तक्रारीनंतर दि. २७.४.२००७ रोजी नव्याने मीटर बसविण्यात आले व तो नवीन मीटर हा ९०१२०५१३४४ असा होय.

अर्जदाराने तक्रार केल्यावर विद्युत वितरण कंपनीने जुने मीटर काढून घेतले व नवीन बसविले. अशा तक्रार अहवालामध्ये मिटरमध्ये कोणताही दोष नसून उलटपक्षी असे मीटर ७.६६% स्लो असलेचे दिसून आले. अंतर्गत तक्रार निवारण कक्षापुढे आलेल्या वरील प्रमाणे सर्व बाबींवरुन दिनांक २७.८.२००८ रोजी तक्रारदार अर्जाचा निकाल करण्यात आला. त्या आदेशाप्रमाणे आलेले माहे जानेवारी २००७चे विद्युत देयक हे १५ महिन्यांचे प्रत्यक्ष वीज वापराचे असलेचे आढळून आलेले आहे व त्याबाबत त्यांना ३ हप्ते देण्यात आले. मात्र वरील बाब ही मीटर रिडरच्या निष्काळजीपणामुळे घडलेली असून संबंधित मीटर रिडरला रु. १००/– चा दंड करण्यात आलेला आहे.

वरील आदेशाविरुध्द या मंचाकडे अपील केले आहे. अर्जदाराने चुकीचे वीज देयक दुरुस्त करुन देण्याची मागणी केली असून या प्रकरणी त्याला झालेला मानसिक त्रास तसेच त्याचा वीज पुरवठा खंडित केल्यामुळे झालेल्या बदनामीबद्दल नुकसान भरपाईची मागणी केलेली आहे.

सदर अपीलाबाबत वि.प.स म्हणणे सादर करण्यास संधी दिली. त्याप्रमाणे दिनांक २३.९.२००८ रोजी सहाय्यक अभियंता, उप विभाग वडगाव यांनी आपले म्हणणे व त्यासोबत कागदपत्रे हजर केली. यामध्ये सीपीएलचा उतारा तसेच वेळोवेळी केलेला पत्रव्यवहार हजर केला आहे.

सदर प्रकरणी सुनावणी दिनांक १३.१०.२००८ रोजी मंचाच्या तिन्ही सदस्यांपुढे घेण्यात आली. अर्जदारातर्फे समक्ष अर्जदार व वि.प. तर्फे श्री. एस.के. पाटील, सहाय्यक अभियंता, तसेच श्री. कुंभार, उच्चस्तर लिपीक हजर झाले. दोन्ही बाजूच्या पक्षकारांनी आपापल्या बाजू सुनावणीवेळी मांडल्या. दोन्ही पक्षकारांतर्फे हजर केलेली कागदपत्रें तसेच तक्रारदाराच्या तक्रारीमधील मजकूर व संबंधित विद्युत पुरवठ्याची नियमावली याचा विचर करता, खालील मुद्दे आमचे विचारार्थ उद्भवतात.



१) संबंधित मीटर नंतर ९००००००८७५७ यामध्ये तांत्रिक दोष आढळून आला आहे काय ?

उत्तर : नाही

२) दिनांक ८.७.२००७ चे देयकामध्ये एकूण वापरलेले युनिट २३१५ हे दिनांक १०.१०.२००६ ते

दि. १०.१.२००७ या केवळ तीन महिन्याचे कालावधीचे आहेत काय ?

उत्तर : नाही. मात्र असा विजेचा वापर हा ऑक्टोबर २००५ ते जानेवारी २००७ या १५ महिन्यांच्या कालावधीतील आहे.

३) तक्रारदार यांना दि. ८.२.२००७ चे दिलेले वीज वापराचे देयक रु. १०१६०/– हे योग्य व बरोबर आहे काय ?

उत्तर : होय

४) अर्जदार यांना कोणतीही नुकसान भरपाई देणे आवश्यक आहे काय ?

उत्तर : नाही

५) आदेश ?

उत्तर : अखेरच्या आदेशाप्रमाणे

**कारणमिमांसा**

सदर प्रकरणामध्ये दि. ८.२.२००७ रोजी ग्राहकास जे देयक देण्यात आले तो कालावधी म्हणजे दि. १०.१०.२००६ ते दि. १०.१.२००७ असा होय. त्यामध्ये मागील रिडींग ४९३५ व चालू मीटर रिडींग ७२५० असे दाखविण्यात आले. परिणामी एकूण वीज वापर २३१५ युनिटचा दाखविलेला आहे. केवळ ३

महिन्याच्या काळामध्ये एवढा वीज वापर होऊ शकत नाही हे ग्राहकाचे म्हणणे जरी योग्य असले तरी असे मीटर रिडींग अचानक कसे आले या बाबत मीटर तपासणी करुन घेणे आवश्यक ठरलेने वितरण कंपनीने लागलीच जुने मीटर काढून घेतले व नवीन मीटर त्याजागी बसवून मीटर तपासणी करुन घेतली. मात्र तपासणीमध्ये मीटरमध्ये दोष आढळून न आलेने तांत्रिकदृष्ट्या देण्यात आलेले विद्युत देयक बरोबर आहे असे होय. मात्र दि. ८.२.२००७ पूर्वीच्या विद्युत देयकांचा विचार करता व या प्रकरणामध्ये दाखल झालेले सीपीएल बाबतचा विचार करता असे दिसून येत आहे की, ऑक्टोबर २००५ मधील चालू मीटर रिडींग ४९३५ व मागील मीटर रिडींग ४८३० असे होते व त्या तिमाहीत १०५ युनिटचा वापर दिसून येतो. पुढे जानेवारी २००६, एप्रिल २००६, जुलैं २००६ व ऑक्टोबर २००६ या चारही तिमाही मधील विद्युत देयकामधील मीटर रिडींग प्रत्यक्षात झाल्याचे दिसून येत नाही, कारण त्या ठिकाणी ' लॉक ' असा शेरा आहे व चारही तिमाहीच्या बिलामध्ये चालू मीटर रिडींग ४९३५ व मागील रिडींग ४९३५ असेच दाखविण्यात आले आहे. परिणामी अंदाजे व सरासरी युनिट वापर दाखविल्याचे दिसते. पुढे जानेवारी २००७ चे मीटर रिडींगचेवेळी फोटो रिडींग आल्याने मागील रिडींग ४९३५ व चालू रिडींग ७२५० असे आल्याने एकूण वापर हा २३१५ एवढ्या युनिटचा दिसून येतो.



वरील प्रमाणे जानेवारी २००७ अगोदर ऑक्टोबर २००५ पासून या काळातील वापरलेले युनिट विचारात घेवून व मीटर रिडींग विचारात घेता असे दिसून येते की, २३१५एवढ्या युनिटचा वापर हा ३ महिन्यामधील नसून हा वापर ऑक्टोबर २००५ नंतर पुढे जानेवारी २००७ पर्यंतचा होय. हा एकूण कालावधी १५ महिन्यांचा आहे. परिणामी २३१५ युनिटचा वापर हा १५ महिन्यांचा झाला असे दिसून येते. दरम्यानचे काळात वितरण कंपनीकडून दिलेली बिले व ग्राहकाने भरलेली रक्कम ही सरासरी बिलापोटी होत. पुढे मीटर बदललेनंतर नवीन मीटर वरील वीज वापराची बिले ग्राहकास मंजूर आहेत व अशी बिले देणे क्रमप्राप्तच आहे. वितरण कंपनीने जानेवारी २००७ मध्ये दिलेली बिले पुढे डिसेंबर २००७ पर्यंत ग्राहकाने भरलेली नाहीत ही वस्तुस्थिती आहे व त्याप्रमाणे डिसेंबर २००७ मध्ये त्यांचा विद्युत पुरवठा तात्पुरता बंद करण्यात आला हीही वस्तुस्थिती आहे.

वरील प्रमाणे केलेल्या चर्चेप्रमाणे जानेवारी २००७ चे बील हे केवळ ३ महिन्याचे नसून १५ महिन्यांचे आहे. ही बाब विचारात घेता ग्राहकाने असे बील भरणे आवश्यक होते व असे बील न भरल्यामुळे विद्युत पुरवठा बंद केला असल्याने वि.प.स दोष देता येत नाही व त्या बाबत कोणतीही नुकसान भरपाई मागण्याचा ग्राहकास अधिकार नाही. वास्तविक जेव्हा ऑक्टोबर २००५ नंतर जानेवारी २००७ पर्यंत ग्राहकास किरकोळ बिले देण्यात आली होती. त्यात्यावेळी ग्राहकाने बिलामध्ये दाखविलेले मीटर रिडींग व प्रत्यक्ष मिटरवरील रिडींगची माहिती वि.प.स देणे आवश्यक होते. एकूण असे दिसून येते की, ग्राहकास १५ महिन्यांचे बील देण्यात आलेचे दिसून येते त्यामधून त्याने भरलेली बाकी क्रेडीट जमा दाखविण्यात आले व उरलेली बाकी भरणे आवश्यक होते. सबब ग्राहकाची नुकसान भरपाई मागणीचा विचार करता येत नाही.

असे असले तरी, ग्राहकाला देण्यात आलेले बील चुकीचे वाटते व ती तो देवू शकत नाही. या बाबत अंतर्गत कक्षाने योग्य तोच निर्णय दिल्याचे दिसून येते.

मात्र न्यायाच्या दृष्टीने, अंतर्गत कक्षाने आदेश दिल्याप्रमाणे जानेवारी २००७ पर्यंतचे दिलेल्या देयकांस हप्तेबंदी देणे क्रमप्राप्त ठरते. तसेच ते देयक हे एकूण १५ महिन्यांचे असलेने त्याची विभागणी करणे आवश्यक

आहे.  अशी विभागणी करुन जी कांही रक्कम होईल त्याचे ग्राहकास चार हप्ते करुन देणे आवश्यक वटते.  तसेच फेब्रुवारी २००७ ते डिसेंबर २००७ पर्यंत ग्राहकाने जी कांही नवीन मिटरवर वीज वापर केला आहे त्या बाबत दिलेल्या देयकाची रक्कम ग्राहकाने भरणे आवश्यक आहे.  ग्राहक रक्कम भरणेस तयार होता पण ती रक्कम मागील बाकीसह दिल्याने व चालू रक्कम न घेतलेने तो ती रक्कम भरु शकला नाही.  त्यामुळे त्याचेवर दंडाची व व्याजाची आकारणी ही चूक होऊ शकेल.  सबब जानेवारी २००७ पर्यंतचे देयक फेब्रुवारी २००७ चे असे त्याची माहेवार विभागणी करणे व त्यातून दंडाची व व्याजाची आकारणी कमी करणे तसेच फेब्रुवारी २००७ ते डिसेंबर २००७ पर्यंतचे देयकावर असलेले व्याज व दंडही माफ करणे आवश्यक ठरते.

असे सर्व बाबींचा विचार करता, वरील प्रमाणे आमचे निष्कर्ष होत.  सबब खालील प्रमाणे आदेश.



**<u>आदेश</u>**

१)	तक्रारदार ग्राहकाची दिनांक ८.२.२००७ चे देयक चुकीचे असल्या बाबतची तक्रार फेटाळण्यात येत आहे.

२)	मात्र वीज देयक हे एकूण १५ महिन्यांचे २३१५ युनिटचे आले आहे.   अशा देयकाचे एकूण युनिट,  १५ महिन्यांमध्ये विभागून अर्जदार ग्राहकास योग्य ते बील व्याज व दंड विरहीत देण्यात यावे व ते भरण्यासाठी ग्राहकास एकूण समान चार हप्ते देण्यात येत आहेत.  पहिला हप्ता त्यास दुरुस्त बील दिल्यानंतर १५ दिवसांनी घेण्यात यावा व उरलेले हप्ते दर एक महिन्याचे अंतराने भरणे  आहेत.

३)	फेब्रुवारी २००७ ते डिसेंबर २००७ पर्यंतचे देयके जरी ग्राहकाने दिली नसली तरी त्यास दंड व व्याज माफ करण्यात येत आहे व त्या देयकाची रक्कम ग्राहकाने दिनांक २४.१०.२००८ पर्यंत भरणे आवश्यक आहे.  अशी चालू देयकाची रक्कम भरल्यानंतर ग्राहकाचा तोडलेला विद्युत पुरवठा त्यास जरुर ती जोडणी फी भरुन घेण्यात येवून जोडून द्यावे.

४)	फेब्रुवारी २००८ चे देयकाप्रमाणे दुरुस्त बील दिल्यानंतर, जर ग्राहकाने चारपैंकी कोणताही हप्ता भरला नाही तर वितरण कंपनीस विद्युत पुरवठा बंद करण्याचा अधिकारी राहील.

५)	या अर्जाचे खर्चाबाबत आदेश नाही.

६)	या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१ यांजकडे करता येईल.

( काकासाहेब य . जगताप )
अध्यक्ष,
ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर

दिनांक : १४.१०.२००८

श्री. जी.सी लेले, ग्राहक सदस्य ..

श्री. एस.आर. बांबळे, सदस्य सचिव ..